

कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

## संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# प्रतिभासंगम



श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...
संगमेश्वर कॉलेज,सोलापूर




प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती** –
प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य
उपप्राचार्य आनंद हुली
प्रा. एस .जे.आवटे
प्रा.दीपक पाटील
प्राचार्य गायत्री कुलकर्णी

**मुखपृष्ठ** – सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी** – प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक** -
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई–मेल** –
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## संपादकीय ...

प्रतिभासंगमच्या तिसऱ्या अंकात कॉलेजमधील वैविध्यपूर्ण घडामोडी घेण्यात आल्या आहेत. संगमेश्वरची क्रीडा क्षेत्रातील परंपरा मोठी आहे. वंदना शानभाग, गोपी मलपेद्दी,अनघा देशपांडे यांच्यासारखे खेळाडू अथलेटिक, जलतरण आणि क्रिकेटमधील खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकले. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस क्रीडा दिन म्हणून साजरा होतो . त्यानिमित्ताने क्रीडा दिनाच्या कार्यक्रमाचा वृत्तांत यामध्ये आला आहे. मसापच्या वतीने श्रावणधारा कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजमध्ये झाले. भाषा संकुलाच्या वतीने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आलं होतं. त्याचा सविस्तर वृत्तांत भाषा प्रेमींना नक्कीच आनंददायी ठरेल. सर्व भाषांची जननी संस्कृत आहे असे म्हटले जाते तिच्या सन्मानार्थ संस्कृत दिनाचा कार्यक्रम कॉलेजच्या कनिष्ठ विभागात झाला.अभियांत्रिकी,वैद्यकीय यासारखे क्षेत्र कोणतेही असो. विज्ञान क्षेत्रात संशोधनाला अतिशय मानाचे स्थान आहे. करिअर करताना विद्यार्थ्यांना संशोधनातील वाटा समजाव्यात म्हणून विज्ञान क्षेत्रातील संशोधनावर व्याख्यान झाले.

कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त आंतरमहाविद्यालयीन भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही झाले.संगमेश्वर पब्लिक स्कूल व आकाशवाणी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला , वक्तृत्व , निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा शिक्षण विभागाकडून मतदार जनजागृती आणि प्राचार्यांची सहविचार सभा झाली. 'आरोग्यम् धनसंपदा' या उक्तीप्रमाणे कॉलेजमधील प्राध्यापकांसाठी डॉ. सुधांशू कोठाडिया यांचे माणकाविकारावर व्याख्यान झाले. साहित्य अकादमी , नवी दिल्ली, संगमेश्वर कॉलेज आणि मसाप शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय परिसंवाद झाला. त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या कादंबरीतून तत्कालीन समाजव्यवस्थेत वितरण होते असा सूर या राष्ट्रीय परिसंवादातून उमटला. वाणिज्य क्षेत्रातील करियर, शब्दकोडे व जाहिरात स्पर्धा या कार्यक्रमाचे वृत्तांत या अंकात आहेत. डिसेंबर महिन्यात आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाच्या वृत्तांतात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीसाठी कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या उपक्रमाचे महत्त्व आपल्याला जाणवल्याशिवाय राहणार नाही. नेटके नियोजन, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग संयोजकांचा उत्साह दुप्पट करणारा होता.या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांच्या वृत्तांतासाठी SES.sangameshwarcollege या कॉलेजच्या यूट्यूब वाहिनीला अवश्य भेट द्या.

# क्रीडा क्षेत्रातले यश नियमित सराव आणि योग्य मार्गदर्शनाने मिळवता येते - धर्मराज काडादी

सोलापूर ( दिनांक 29 )"क्रीडा क्षेत्रातले यश नियमित सराव आणि योग्य मार्गदर्शनानेच यश मिळते. यासाठी आपण ज्या शाळेतून आलो तिथपासून आपापल्या क्रीडा प्रकारातील दैनंदिन सराव महाविद्यालयीन जीवनातील क्रीडाविश्वात करिअर घडवण्यासाठी उपयुक्त ठरतो." असे प्रतिपादन संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी यांनी केलं. ते संगमेश्वर कॉलेज च्या शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात उद्घाटक म्हणून बोलत होते. मंचावर प्राचार्य शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रा.आनंद हुली रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य एस. जे. आवटे संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या प्राचार्य गायत्री कुलकर्णी , शारीरिक शिक्षण विभाग संचालक प्रा.आनंद चव्हाण आदी उपस्थित होते.



**राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात उद्घाटक म्हणून बोलतताना मा. धर्मराज काडादी**



**हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात क्रीडापटू**

.आपल्या प्रास्ताविकात चव्हाण यांनी संगमेश्वर कॉलेज क्रीडाविश्वातील यशस्वी परंपरा सांगितली ते पुढे ,म्हणाले की ," येणाऱ्या काळात या विभागाची अशीच उज्वल घोडदौड कशी राहिली , यासाठी विद्यार्थी प्रयत्नशील आहेत. खेळाडूंच्या परिश्रमातूनच डॉक्टर पुरणचंद्र पुंजाल चषकाचा मानकरी कॉलेजला होता आलं , याचं सगळं श्रेय विद्यार्थ्यांना आहे. कॉलेजचा क्रीडा विभाग भविष्यकाळातही वेगवेगळ्या क्रीडा पुण्यातून अग्रेसर राहील. यासाठी आम्ही विभागाद्वारे प्रयत्नशील आहोत. आमच्या या प्रयत्नांना सकारात्मक साथ देत विद्यार्थी क्रीडा क्षेत्रातील आपलं करिअर पुढे नेतील असा विश्वास वाटतो. " .



**तृप्ती रमेश आवताडे आणि त्यांच्या संघाने योगा प्रात्यक्षिक सादर केले**

त्यानंतर प्रमुख मान्यवरांचा सत्कार झाला. सत्कारानंतर तृप्ती रमेश आवताडे आणि त्यांच्या संघाने बहारदार योगा प्रात्यक्षिक सादर केले . त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन झाले. याप्रसंगी उपप्राचार्य वादिराज कुलकर्णी , प्रा. उषा जमादार, प्रा. राजकुमार मोहोरकर, प्रा. गौतम दळवी , प्रा. शिवराज पाटील, प्रा. शिवशरण दुलंगे,प्रा. शहाजी माने, प्रा. संतोष खेंडे, प्रा. हर्षवर्धन पाटील , प्रा. संतोष पवार यांच्यासह बहुसंख्य क्रीडाप्रेमी आणि खेळाडू उपस्थित होते . कब्बडी, खोखो, हॅण्डबॉल , व्हॉलीबॉल , क्रिकेट, सॉफ्टबॉल या सामान्यांची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. प्रा. शरण वांगी यांनी सूत्रसंचालन केलं तर प्रा. विक्रांत विभुते यांनी आभार मानले. या प्रसंगी बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.



# 'श्रावणधारा ' जिल्हास्तरीय महाविद्यालयीन कविता स्पर्धा संगमेश्वर कॉलेजमध्ये संपन्न झाली.



'श्रावणधारा ' जिल्हास्तरीय महाविद्यालयीन कविता स्पर्धा प्रसंगी बोलताना मराठी विभागप्रमुख प्राध्यापक डॉ.सुहास पुजारी आणि उपस्थित काव्यप्रेमी रसिक



# भोवतालच्या सूक्ष्म निरीक्षणातूनच काव्य स्फूरते - शिवाजी सातपुते

## भाषा संकुल कविसंमेलनात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

सोलापूर - प्रतिनिधी (दिनांक३०)----भोवतालच्या निरीक्षणातूनच काव्य स्फूरते . त्यासाठी विविध भाषेतील साहित्याचं वाचन ही विद्यार्थ्यांनी करावं. असे विचार मंगळवेढ्याचे कवी शिवाजी सातपुते यांनी व्यक्त केले . ते संगमेश्वर कॉलेजमध्ये भाषा संकुलात तर्फे आयोजित केलेल्या कविसंमेलनात बोलत होते. मराठी हिंदी इंग्रजी कन्नड संस्कृत भाषेतील स्वरचित आणि मान्यवर कवींच्या रचना यावेळी उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांकडून सादर झाल्या. चारोळ्या पासून ते पोवाड्यात पर्यंत कवितेतील विविध प्रकार मंचावर आले. याप्रसंगी मंगळवेढ्याचे कवी इंद्रजित घुले, मराठी विभाग प्रमुख डॉ.सुहास पुजारी, उपप्राचार्य प्रा आनंद हुली पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, भाषा समन्वयक शिवराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन झाले. शिवराज पाटील यांनी भाषा संकुलाच्या या अभिनव प्रयोगाचे महत्त्व सांगितलं. संतोष पवार यांनी कवींचा परिचय करून दिला. त्यानंतर कॉलेजच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. स्वरचित कविता सदाबहार सादरीकरण नऊ विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केल्या आणि 16 विद्यार्थ्यांनी मराठी साहित्यातील मान्यवर कवींच्या कविता म्हंटल्या . प्रा. शहानुर शेख , प्रा.हर्षवर्धन पाटील ,प्रा.रश्मी कन्नूरकर यांनीही स्त्रीवादी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. भाषा संकुलाच्या या उपक्रमाचे उपयुक्तता सांगत कविता आणि कवींचा स्नेह प्रकट केला.

मराठी विभाग प्रमुख डॉ. सुहास पुजारी यांनी प्रास्तविक केले. कवी इंद्रजित घुले यांनी महाविद्यालयीन जीवनातील भाषेचे महत्व आणि व्यक्तिमत्व विकास यावर प्रकाश टाकत आपल्या कवितेतून विद्यार्थ्यांना मनमुराद हसवले आणि अंतर्मुखही केले . दिव्यांग असलेल्या अन्वी राठी या विद्यार्थिनीने देखील इंग्रजीतून आपली कविता सादर केली आणि उपस्थितांची वाहवा मिळवली. या कवी संमेलनासाठी भाषा संकुलातील सर्व प्राध्यापक मंडळींनी नेटके नियोजन केले होते.





संगमेश्वर कॉलेजमध्ये भाषा संकुल आयोजित कविसंमेलनात बोलताना मंगळवेढ्याचे कवी शिवाजी सातपुते



कवी शिवाजी सातपुते पुढे म्हणाले की "आपण ज्या परिसरात राहतो वावरतो त्या परिसरातील सूक्ष्म निरीक्षणातून आपले विचार प्रगल्भ बनतात आणि समस्येतून , परिस्थितीच्या जाणिवेतून आपल्या मनात विचारांचा आंदोलन सुरू होतात . शब्दारूपाने भाव कागदावर उतरतात आणि त्यातून नवनिर्मिती होते. मग ती कविता असो, कादंबरी असो अथवा कथा असो साहित्यातले हे प्रकार आपोआपच आपल्याला शिकवत राहतात. सूक्ष्म निरीक्षण करता करता आपण विविध भाषेतील सांस्कृतिक कार्यक्रमात कृतीयुक्त सहभाग नोंदवला की आपली स्वतंत्र विचारसरणी तयार होते. आपली साहित्यातील प्रगल्भता निर्माण होते.
"

कन्नड जानपद गीतापासून ते संस्कृतातील पोवाड्यापर्यंत विविध काव्यप्रकार मंचावर सादर झाले.मान्यवर कवींच्या हास्य कवितांनी विद्यार्थ्यांना पोट भरून हसवलं आणि प्राध्यापकांनी स्वरचित कवितांच्या माध्यमातून हसवता हसवता सद्य परिस्थितीवर विवेचन करत झणझणीत अंजन घातले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षाराणी बावकर हिने केले तर आभार पर्यवेक्षक प्रसाद कुंटे यांनी मानले.

याप्रसंगी प्रा. दादासाहेब खांडेकर प्रा. अनिता अलकुंटे,प्रा. शिवशरण दुलंगे,प्रा. तानाजी घाडगे,प्रा. साहेबण्णा निम्बर्गी,प्रा. शंकर कोमुलवार,प्रा.कोमल कोंडा, डॉ. गणेश मुंडेगावकर,प्रा. प्रदीप आर्य , प्रा. एस. पाटील , प्रा. दत्तात्रय गुड्डेवाडी , प्रा. विश्वनाथ कक्कळमेली,प्रा.शिवराज देसाई, चिदानंद स्वामी यांच्यासह भाषा संकुलातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.





**संगमेश्वर कॉलेजमध्ये भाषा संकुल आयोजित कविसंमेलनात कविता सादर करत दिव्यांग अवनी राठीने रसिकांची मने जिंकली**

# संस्कृत दिन
# भाषा आणि कलेने जीवन समृद्ध होते –मनीषा जोशी





सोलापूर ( दिनांक 20)
'जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावरील क्षणांना अविस्मरणीय करण्यासाठी भाषा आणि कलेची गोडी असावी लागते. त्यातूनच आपले जीवन समृद्ध होतेय. व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू यातून घडतात' असे प्रतिपादन प्रसिद्ध कथक नृत्यांगना मनीषा जोशी यांनी केले. त्या संगमेश्वर कॉलेजच्या संस्कृत दिन कार्यक्रमात बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील,संस्कृत विभाग प्रमुख प्रा. प्रदीप आर्य उपस्थित होते. प्रारंभी संस्कृतातून सरस्वती वंदना सादर झाली. मान्यवरांच्या हस्ते देवी शारदेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर प्रदीप यांनी संस्कृतातून प्रास्ताविक केलं.कु.मानसी जोशी हिने पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर ऋषिकेश कुलकर्णी,शिवराज स्वामीआणि सहकाऱ्यांनी यांनी संस्कृतातून नाट्य तर अन्वीने पोवाडा सादर केला.






**संगमेश्वर कॉलेजच्या संस्कृत दिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी  सादरीकरण दिलं**

" भारतीय संस्कृतीत कलेची परंपरा अनादी काळापासून चालत आलेली आहे. त्या माहित करून घेणे अत्यंत गरजेचे आहे त्या समृद्ध कला परंपरा विद्यार्थ्यांनी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमातून माहीत करून घ्याव्यात. अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून अभिजात कलांचे दर्शन होत असतं नृत्य, चित्र-शिल्प, संगीतातून अव्यक्त भावनांचा अविष्कार होत असतो. कलेच्या विविध वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरणातून मनाची मशागत होते. ही मशागत उत्तम जीवन घडवण्यास मदत करते.कॉलेज जीवनातील कलेचा छंद आत्मिक समाधान देतो." असेही जोशी म्हणाल्या . त्यानंतर त्यांनी कथ्थकचे बहारदार सादरीकरण केले. सूत्रसंचालन कु. अनन्या देशपान्डे हिने केले, तर आभार कु.तृप्ती जोशी हिने मानले. याप्रसंगी प्राध्यापिका मंजुळा बीड, प्रा.शंकर कोमुलवार प्रा. संतोष पवार प्रा. हर्षवर्धन पाटील प्रा.देसाई यांच्यासह विद्यार्थी वर्ग या बहारदार सादरीकरणात रमून गेला होता.

# विद्यार्थ्यांनो नोकरीपेक्षा विज्ञानातील संशोधनाकडे वळा
# -प्रा.शशिकांत हिपरगी

## संगमेश्वर मध्ये विज्ञानातील संशोधन या विषयावरील व्याख्यान



सोलापूर (दिनांक२३) "मेडिकल - इंजिनिअरिंग यासह कोणत्याही क्षेत्रातील शिक्षण जरूर घ्या . जे क्षेत्र निवडाल त्या क्षेत्रात नोकरीपेक्षा संशोधनाकडे विद्यार्थ्यांनी वळले पाहिजे. संशोधन क्षेत्रातील आव्हाने स्वीकारून काम केल्याने आपण उत्तम संशोधक बनू शकतो. समाजोपयोगी संशोधन ही देशाची सध्याची गरज आहे.

आपण ज्या समाजातून आलो त्या समाजाचं ऋण फेडण्यासाठी सज्ज व्हा. विज्ञान क्षेत्रातील संशोधन वैद्यकीय ,शेती, उद्योगांना उभारी देते. उद्याच्या सक्षम भारतासाठी याची नितांत गरज आहे . "असे प्रतिपादन प्रा. शशिकांत हिप्परगी यांनी केलं



ते संगमेश्वर कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या विज्ञानातील संशोधन या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. याप्रसंगी पर्यवेक्षक प्रा. प्रसाद कुंटे विज्ञान विभाग प्रमुख प्रमोद उडगीकर, प्रा. बाळकृष्ण कापसे आदी मंचावर उपस्थित होते.



**संगमेश्वरमध्ये विज्ञानातील संशोधन या विषयावरील व्याख्यानात बोलताना प्रा. शशिकांत हिप्परगी आणि उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग**

प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. नागेश कोल्हे यांनी करून दिला तर प्रास्ताविक बाळकृष्ण कापसे यांनी केलं. आपल्या अभियांत्रिकी क्षेत्रातील यज्ञेश बासुतकर आणि अजय दिघोळे या विद्यार्थ्यांनी संशोधनात केलेले करिअर विद्यार्थ्यांपुढे ठेवत. हिप्परगी यांनी दिलखुलास संवाद साधला.संशोधन क्षेत्रातील सोलापुरातील संशोधकांची उदाहरणे त्यांनी दिली . दरम्यान प्रा. विजय जोकारे यांनी मार्गदर्शन केलं ते म्हणाले , " संशोधनाची वृत्ती निर्माण होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना समाजातल्या वेगवेगळ्या क्षेत्राकडे त्यांच्यातील समस्येकडे जिज्ञासेच्या भावनेने पाहिले की समस्यांचे निराकरण होते. या समस्या वरील उपाय म्हणजे एक सूत्रबद्ध संशोधन होय. संशोधनाला बळकटी प्राप्त करण्यासाठी आपण तिला वैज्ञानिक दृष्टिकोन अभियांत्रिकीची जोड आणि वैज्ञानिक दृष्टी देतो. म्हणून संशोधन कार्याला यश मिळते." बौद्धिक खेळाच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रूपाली अंबुलगे यांनी केले तर प्रा. रोहन डोंगरे यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. सुभाष पाटील , प्रा. तुकाराम साळुंखे,प्रा.संतोष पवार, प्रा.विश्वजित आहेरकर, प्रा. विशाल जत्ती यांच्यासह विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कर्मयोगी अप्पासाहेबांनी निस्पृह वृत्तीने समाज कार्य केलं

## -भीमाशंकर बिराजदार





सोलापूर ( दिनांक 14) "समाजकारण करताना सोलापूरच्या हिताचा विचार अप्पासाहेब करायचे आणि राजकारणात वावरताना लोकोपयोगी कामे कशी होतील हे पाहताना त्यांनी निस्पृह वृत्तीने समाजकार्य केलं." असे प्रतिपादन डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केलं.

ते कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांच्या जयंती दिनानिमित्त संगमेश्वर कॉलेज, दैनिक संचार प्रबोधन मंच, कर्मयोगी आप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन सत्रात बोलत होते

याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संजय आवटे, दैनिक संचार उपसंपादक प्रशांत जोशी पतसंस्थेचे प्रा. बी. एन. पटणे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी रसिका कुलकर्णी हिने ईशस्तवन सादर केले. त्यानंतर प्रशांत जोशी यांनी प्रास्ताविक केले . पाहुण्यांचा परिचय डॉक्टर राजकुमार मोहोरकर यांनी करून दिला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.







प्रमुख पाहुण्यांचा सत्कार कॉलेजच्या वतीने करण्यात आला. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक प्राचार्य गणेश देशपांडे, डॉक्टर दत्ता घोलप, भीमगोंडा पाटील यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारानंतर प्राध्यापक डॉक्टर भीमाशंकर बिराजदार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



## निकाल

**वैष्णवी घोडके (प्रथम -हिराचंद नेमचंद कॉलेज )**
**सुरजसिंह माने ( द्वितीय- दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय )**
**श्वेता झंवर( तृतीय- हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स)**
**श्रेया माशाळ (चतुर्थ- संगमेश्वर महाविद्यालय )**
**प्राजक्ता धुमाळी (पाचवा क्रमांक- संगमेश्वर महाविद्यालय)**
**ऐश्वर्या ढेपे ( सहावा- संगमेश्वर महाविद्यालय)**
**उत्तेजनार्थ- सौरभ वाघमारे (दयानंद कॉलेज) अनिकेत जगताप (वालचंद कॉलेज)**

स्पर्धा यशस्वितेसाठी प्राध्यापक डॉ. सुहास पुजारी, प्रा. शिवराज पाटील , प्रा.शिला रामपुरे, प्रा.मंजू संगेपांग , प्रा.दत्तात्रय गुडडेवाडी, प्रा. सायबण्णा निम्बर्गी, प्रा. राजकुमार खिलारे, प्रा.सुहास दहिटणेकर प्रा. प्रदीप आर्य यांनी सहकार्य केलं. सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले. तर भीमाशंकर पटणे यांनी आभार मानले

# शालेय जीवनातील वाणीच्या संस्कारातूनच व्यक्तिमत्व घडते
# -सुनील शिनखेडे

## आकाशवाणी आणि संगमेश्वर पब्लिक स्कूल आयोजित स्पर्धा उत्साहात

**सोलापूर प्रतिनिधी (दिनांक १३)** "शालेय जीवनातील वाणीच्या संस्कारातूनच व्यक्तिमत्व घडते " असे प्रतिपादन सोलापूर आकाशवाणी चे सहाय्यक संचालक (कार्यक्रम) सुनील शिनखेडे यांनी केलं ते आकाशवाणी आणि संगमेश्वर पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.याप्रसंगी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य शीतल काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी, कार्यक्रम अधिकारीरमेश गोखले, निवेदक अभिराम सराफ ,प्राचार्य गायत्री कुलकर्णी उपस्थित होते. प्रारंभी कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून , दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार पब्लिक स्कूलच्या वतीने झाला. यावेळी बोलताना सुनील शिनखेडे म्हणाले की , " बदलत्या तंत्रज्ञानानुसार जग बदलत आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा मुलांनी शालेय जीवनात योग्य पद्धतीने उपयोग केला दिशा मिळते.."






**संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य शीतल काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी, कार्यक्रम अधिकारी रमेश गोखले, निवेदक अभिराम सराफ ,प्राचार्य गायत्री कुलकर्णी उपस्थित होते.**



**संगमेश्वर पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना मा. धर्मराज काडादी व उपस्थित मान्यवर**

आज आकाशवाणी विविध गटातील श्रोत्यांसाठी वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची निर्मिती करते .

जगभरात प्रसारभारतीच्या ॲप वरून आकाशवाणीचे हे कार्यक्रम ऐकू शकतात.याचाही लाभ पालकांनी घ्यावा त्यानंतर निवेदक अभिराम सराफ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला ते म्हणाले की," उच्चार शुद्धता येण्यासाठी श्लोक पाठांतर यापासून शालेय स्तरावरील पाठांतर स्पर्धेत सहभागी व्हा . चांगले ऐकले की चांगले बोलता येते , त्यासाठी पालकांनी मुलांसाठीच्या कार्यक्रमाची ओळख आपल्या पाल्यांना करून द्यावी"

आपल्या अध्यक्षीय भाषणात धर्मराज काडादी यांनी कर्मयोगी आप्पासाहेब यांच्या आठवणी सांगत आकाशवाणी आणि संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थी स्पर्धकांचे कौतुक केले. उपस्थित सर्व स्पर्धकांशी दिलखुलास संवाद साधत शुभेच्छा दिल्या.



## निकाल
## चित्रकला स्पर्धा

इयत्ता पहिली ते चौथी
श्रीरंग पवार (प्रथम-दमाणी विद्यामंदिर),
रितीका श्रीमल (द्वितीय विभागून -संगमेश्वर पब्लिक ) अवनी सामल ( द्वितीय विभागून-दमाणी विद्यामंदिर),अथर्व भेंडगे( तृतीय - सिद्धेश्वर बाल मंदिर ),अनुष्का पंचाक्षरी ( उत्तेजनार्थ - सिद्धेश्वर मॉंटेसरी ),निखिल येमूल (उत्तेजनार्थ- व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश )

**वक्तृत्व स्पर्धा**

बाल गट इयत्ता ५ वी ते ७ वी
पावनी हिबारे (प्रथम-एस. आर. चंडक),
रोहन कबाडे (द्वितीय - पी. एस . इंग्लिश ) , श्रवंती मोने ( तृतीय - जैन गुरुकुल ),दीपिका चडडे ( उत्तेजनार्थ - विद्यानिकेतन ),वेदिका आंधळकर (उत्तेजनार्थ- दमाणी विद्यामंदिर )
किशोर गट - (इयत्ता ८ वी ते १० वी )
अनुष्का बिराजदार (प्रथम-दमाणी विद्यामंदिर),
नमिता चट्टे (द्वितीय -विद्यानिकेतन प्रशाला) , साक्षी पवार ( द्वितीय विभागून- सेवासदन ),
गौरी शिंदे ( तृतीय -सिद्धेश्वर कन्या), स्नेहा माने ( उत्तेजनार्थ - ज्ञानप्रबोधिनी),ऐश्वर्या मोने (उत्तेजनार्थ- जैन गुरुकुल)

**निबंध स्पर्धा**

बाल गट इयत्ता ५ वी ते ७ वी
हर्षदा तांदळे (प्रथम- सिद्धेश्वर बाल मंदिर )
ऐश्वर्या पवार ( द्वितीय विभागून - विद्यानिकेतन ),प्राजक्ता साळुंके ( द्वितीय विभागून-शरदचंद्र पवार प्रशाला ),वृषाली लोंढे ( तृतीय - महात्मा गांधी विद्यालय, कळमण),समर्थ माने ( उत्तेजनार्थ - वेलेन्टाइन सर्कल ),श्रुती होमकर ( उत्तेजनार्थ - एस. आर. चंडक इंग्लिश )
किशोर गट - निबंध स्पर्धा (इयत्ता ८ वी ते १० वी )
श्रेयस काटकर ( प्रथम -शरदचंद्र पवार प्रशाला )
सई जकनाईक ( द्वितीय विभागून - ज्ञाप्रबोधिनी ), राजनंदिनी नीळ (द्वितीय विभागून - सेवासदन ), अंजली भुसे ( तृतीय - सेवासदन ) ,सुकन्या मुळीक ( उत्तेजनार्थ - सुयश गुरुकुल ) , वेदिका मुद्याल ( उत्तेजनार्थ - विद्यानिकेतन )
या स्पर्धेत एकूण 321 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. सविता गायकवाड, नुरंदय्या स्वामी, राजकुमार उंबरजे, तृप्ती कुलकर्णी ,प्रभानंद पाटील, प्राध्यापक शिवराज पाटील, प्रा.अनिता अलकुंटे प्रा. मीनाक्षी रामपुरे, रेखा पटणे, प्रा.दीपक पाटील, भाग्यश्री राठोड, संगीत यादव, ज्योती माने यांनी परीक्षण केले.
स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. दिपाली करजगीकर ,प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य वादिराज कुलकर्णी, प्रा. शिवराज पाटील , प्रा.अनिता अलकुंटे, वैष्णवी देशपांडे, तृप्ती दुलंगे यांनी सहकार्य केले. याप्रसंगी शहर आणि जिल्ह्यातील विद्यार्थी, सह-शिक्षक तसेच संगमेश्वर पब्लिक स्कूलचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.प्रा.संतोष पवार यांनी सूत्रसंचालन केले तर कविता हत्तीकाळे यांनी सर्वांचे आभार मानले.

# विविध कला प्रकारातून प्रभावी मतदार जनजागृती करावी

**-उपशिक्षणाधिकारी सुधा साळुंखे**

# संगमेश्वरमध्ये प्राचार्यांची सहविचार सभा संपन्न







**सोलापूर प्रतिनिधी**

--दिनांक

"पथनाट्य, पोवाडे, भारुड, चित्रकला, रांगोळी या विविध कला प्रकारातून प्रभावी मतदार जनजागृती शाळा महाविद्यालयांनी करावी. यासाठी विद्यार्थी ,शिक्षक आणि प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे." असं मत **उपशिक्षणाधिकारी सुधा साळुंखे यांनी मांडले**

त्या संगमेश्वर कॉलेजमध्ये उच्चमाध्यमिक शिक्षण विभागामार्फत आयोजित मतदार जनजागृती अभियान आणि प्राचार्यांच्या सहविचार सभेत बोलत होत्या.

मंच्यावर शिक्षणविस्तार अधिकारी अशोक भांजे ,शिक्षण उपनिरीक्षक मिलिंद मोरे , उपप्राचार्य आनंद हुली उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांचे सत्कार कॉलेजच्या वतीने झाला. त्यानंतर मिलिंद मोरे यांनी प्रास्ताविकातून शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली. कार्यक्रमात मतदार जनजागृती ची शपथ उपस्थित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यात आली. याप्रसंगी शहर जिल्ह्यातील प्राचार्यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केलं. तर उपप्राचार्य आनंद हुली यांनी सर्वांचे आभार मानले.



# बदलत्या जीवनशैलीमुळे मणका विकार वाढले आहेत
## -डॉ. सुधांशु कोठाडीया

# संगमेश्वर कॉलेजमध्ये मणका विकारावर व्याख्यान



सोलापूर (प्रतिनिधी) 'बदलत्या जीवनशैलीमुळे सर्वच क्षेत्रातील नोकरदार यांमध्ये मणक्याचे विकार वाढलेले आहेत. त्यासाठी आपण आपल्या दैनंदिन कामाचे योग्य नियोजन करून आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे' असे प्रतिपादन **डॉक्टर सुधांशु कोठाडीया यांनी केले.** ते संगमेश्वर कॉलेजमध्ये मणका विकारावरील व्याख्यानात बोलत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य होत्या.

प्रारंभी कॉलेजच्या वतीने डॉक्टर कोठाडीया यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर डॉक्टरांनी स्लाईड शोच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले." मणका विकारात - गॅप पडणे, चक्कर येणे, डाव्या हाताला मुंग्या येणे, कंबर दुखी, पायात गोळे येणे यासारखे आजार बळावतात. या सगळ्याच्या मुळाशी गेल्यानंतर लक्षात येते की,आपण आपल्या शरीराकडे वेगवेगळ्या कारणांनी दुर्लक्ष करतो. त्यातून या विकारांत कडे मानवी शरीर झुकते. आपल्या अनेक असंबद्ध सवयीतून मणक्याचे आजार, पाठ दुखी असह्य करते. त्यासाठी आहार-विहार याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. रोग होण्यापेक्षा टाळलेला बरा ".
असेही ते म्हणाले.

याप्रसंगी उपप्राचार्य डी. एम. मैत्री, डॉ. राजकुमार मोहरकर, डॉ. सुहास पुजारी, डॉ. ऋतुराज बुवा, डॉ. मंगलमूर्ती धोकटे,प्रा. अशोक माशाळे,डॉ.वंदना पुरोहित, डॉ. दिपाली करजगीकर, डॉ. गणेश मुडेगावकर, प्रा. विशाल जत्ती, प्रा. संतोष पवार, प्रा. नागेश कोल्हे, राहुल कराडे, सोमशेखर धड्डे ,यांच्यासह संगमेश्वर शिक्षण संस्थेतील विद्यार्थी , शिक्षक प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# त्र्यं. वि.सरदेशमुख यांच्या कादंबरीतून तत्कालीन समाज व्यवस्थेचे चित्रण होते

## साहित्य अकादेमी, संगमेश्वर कॉलेज आणि मसाप पुण्याची सोलापूर शाखा यांच्या राष्ट्रीय परिसंवादात मान्यवरांनी मांडले विचार





सोलापूर ( प्रतिनिधी) जेष्ठ साहित्यिक प्राध्यापक त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या कादंबरीतून तत्कालीन समाज व्यवस्थेचे चित्रण होते.

असा सूर उद्घाटनानंतर च्या दुपारच्या पहिल्या सत्रात उमटला .सरदेशमुख यांचं संस्मरण या विषयावर सकाळचे मुख्य उपसंपादक रजनीश जोशी यांनी आपल्या आठवणी सांगितल्या. यामध्ये बापूंचा स्वभाव कसा मिश्कील होता .त्यांच शब्दवैभव आणि धडपडणार्या मुलांसाठी ते कसे आधारवड होते या हृद्य आठवणी त्यांनी सांगितल्या.

भाषेचं गारुड वाचकांवर घालणारी कलाकृती सरदेशमुख सरांनी निर्माण केली.असं नितीन वैद्य म्हणाले. डांगोरा आणि बखर एका राजाची यातील भाषाशैली अस्सल सोलापुरी शब्दांचा परिचय करून देणारी ठरली आणि बापूंच्या या शैलीचा संशोधक अभ्यासकानी नोंद करून ठेवावी असं कार्य त्यातून झालंय.असं आकाशवाणीचे सहायक संचालक कवी,लेखक सुनील शिनखेडे म्हणाले

पुण्याच्या मेधा सिधये यांनी कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रांचा वाचकांवर कसा प्रभाव पडतो. यातील खलनायक , सामाजिक क्षेत्रातील मवाळ माणसे, सरळ नीती मार्गाने जाणारी माणसे या सगळ्यांचा धांडोळा सरदेशमुख कसे घेत जातात आणि त्यातून वाचक कसा खिळून राहतो हे स्पष्ट केले. पहिल्या परिसंवादातील अध्यक्षस्थानावरून बोलताना चित्रपट समीक्षक विजय पाडळकर यांनी सरदेशमुखांचा आणि त्यांचा परिचय कसा झाला आणि त्यातून ते समृद्ध कसे होत गेले. यातून एकूणच साहित्याचा विचार,सामाजिक स्थित्यंतरे, कादंबऱ्यांमधून त्यांनी हाताळलेले विषय या सगळ्या बाबी आपल्या अध्यक्षीय मनोगतात मान्यवरांनी मांडलेल्या विचारांचीची दखल घेत त्यानीअभ्यासपूर्ण समारोप केला.










दुपारच्या दुसऱ्या सत्रात डॉक्टर राजशेखर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राजा होळकुंदे , मनोज कुलकर्णी, हेमकिरण पत्की यांनी सरदेशमुख सरांची समीक्षा आणि त्यांच्या कवितेतील संवेदनविश्व या विषयावर आपले विचार मांडले. मूळ साहित्यकृती निर्माण करणारा लेखक आणि समीक्षक, अनुवादक यांच्यातील फरक कसा होत जातो. तत्कालीन संदर्भः ,परंपरा आणि साहित्य व्यवहार या गोष्टी परिसंवादातून पुढे आल्या. आपल्या अनेक कवितांच्या माध्यमातून सरदेशमुख सरांनी कवितेतले एक संवेदनशील विश्व कसं जपलं ते कसं वाढवलं त्यांचे कार्यक्रम कसे व्हावेत या संदर्भात कसे दक्ष होते. याविषयी कवी हेमकिरण पत्की यांनी आपल्या आठवणी त्यांचा सहवास उपस्थितांना सांगितला. डॉ. राजशेखर शिंदे यांनी समीक्षा आणि कवितेतील अनुबंध याविषयी भाष्य करत अध्यक्षीय समारोप केला.







या दोन्ही सत्रास उपप्राचार्य धानप्पा मैत्री,वंदना पुरोहित, डॉ.सारीपुत्र तुपेरे, संघ प्रकाश दुड्डे, मनोज कुलकर्णी, राजा होळकुंदे, प्रिया निघोजकर , डॉ. दत्ता घोलप, डॉ.रमेश शिंदे, मसापचे दत्ता अण्णा सुरवसे, पद्माकर कुलकर्णी, प्राध्यापक नरेंद्र काटीकर, प्राध्यापक एस. बी. निंबर्गी, दत्तात्रय गुड्डेवाडी आदी साहित्यप्रेमी आणि संशोधक मंडळी उपस्थित होती.

या दोन्ही सत्राचे सूत्रसंचालन प्रिया निघोजकर यांनी केले. संगमेश्वर कॉलेजच्या संयोजन समितीच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

# विद्यार्थ्यांनो बदलत्या तंत्राचा स्वीकार करुन वाणिज्य क्षेत्रात करिअर करा -सी.ए धीरज बलदोटा





**सोलापूर** (दिनांक 30 ) ''विद्यार्थ्यांना बदलत्या तंत्राचा स्वीकार करुन वाणिज्य क्षेत्रात करिअर करा ''असे प्रतिपादन सीए धीरज बलदोटा यांनी केलं ते संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजच्या वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या व्याख्यानात बोलत होते. याप्रसंगी मंचावर प्रा.प्रभाकर नागणसूरे, प्रा. मल्लिनाथ साखरे उपस्थित होते. बलदोटा पुढे म्हणाले की,'' पाश्चात्त्य बलाढ्य राष्ट्रे जगावर जगातील सगळी वैयक्तिक माहिती संकलित करुन नियंत्रण करु पाहत आहेत. एकीकडे तरुणांना तंत्रशिक्षणाचे गरज आहे. शेती विकासाला प्राधान्य देणारे उपक्रम आणि प्रोजेक्ट लोकांपर्यंत पोहोचले तर येणाऱ्या काळात राष्ट्राचा विकास शक्य आहे. अशा वेळी वाणिज्य क्षेत्रात करिअर साठी उपल संधी त्यातील आव्हाने वेळीच ओळखा, जाणून घ्या. त्याप्रमाणे नियोजनबद्ध अभ्यासाला लागला , तरच आपले करिअर घडू शकते.'' प्रारंभी कॉलेजच्या वतीने धीरज बलदोटा आणि गोपाळ डागा यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रभाकर नागणसूरे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविका नंतर बलदोटा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गोपाल डागा यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील आव्हानांना आपण कसे सामोरे जावेत याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राध्यापिका मंजुळा बीड, सारिका वर वरवडकर, रूपाली पाटील, बसय्या हणमगाव, बाबासाहेब सगर, सचिन जम्मा, रवींद्र बिराजदार ,निनाद सपकाळ , संतोष पवार आदी प्राध्यापक मंडळी उपस्थित होती. संगीता म्हमाणे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार मल्लिनाथ साखरे यांनी मानले.

# संगमेश्वरच्या शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर (दिनांक १९)**
संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजच्या वतीने इयत्ता अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धा घेण्यात आली. हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड, संस्कृत या भाषेत या स्पर्धा सकाळी 11 ते 12 या वेळेत कॉलेजच्या आवारात पार पडली . वेगवेगळ्या भाषांमधून भाषिक कौशल्ये वाढीस लागून कल्पनाशक्ती स्वभाव देण्यासाठी या स्पर्धा घेण्यात येतात, असं कॉलेजच्या वतीने सांगण्यात आले . शहर आणि परिसरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी स्पर्धकांनी यामध्ये उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी कल्पक जाहिराती तयार करून आपले कौशल्य दाखवले.
स्पर्धा यशस्वीतेसाठी भाषा समन्वयक प्राध्यापक शिवराज पाटील, तानाजी घाडगे ,सायबण्णा निम्बर्गी, मंजुळा बीड, डी. जी. दुलंगे , अनिता अलकुंटे, डॉक्टर गणेश मुडेगावकर , कोमल कोंडा,दत्तात्रय गुड्डेवाडी, संतोष पवार ,प्रदीप आर्य आदींनी सहकार्य केलं . कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि स्पर्धेचे मूल्य कळावे या हेतूने ही स्पर्धा आयोजित करण्यात येते .असे उपप्राचार्य आनंद हुली यांनी सांगितले.
आमच्या महाविद्यालयीन जीवनात अशा वैविध्यपूर्ण स्पर्धांचा उपयोग आमच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात होतो म्हणून आम्ही या स्पर्धेत सहभागी झालो. आमच्या शिक्षकांचे आम्हाला मार्गदर्शन लाभले आणि ही स्पर्धा देण्यासाठी आम्ही आलो. नियोहजन उत्तम होते.असेही या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं.





**संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजच्या वतीने इयत्ता अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धा घेण्यात आली त्याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी**

# संगमेश्वरच्या सामान्यज्ञान स्पर्धेत चन्नाप्पा येळगे, राजश्री हिप्पर्गीकर प्रथम

सोलापूर (प्रतिनिधी)
संगमेश्वर कॉलेजच्या वतीने प्रतिवर्षी सामान्यज्ञान स्पर्धा घेण्यात येते. स्पर्धा परीक्षेतीलआव्हाने मुलांना समजावीत या हेतूने ही स्पर्धा प्रतिवर्षी घेतली जाते. यंदाच्या वर्षी कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. या सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये चन्नाप्पा येळगे, राजश्री हिप्पर्गीकर प्रथम यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपातील प्रश्न चालू घडामोडी वर विचारण्यात आले होते. प्रथम लेखी परीक्षा झाली. त्यानंतर गटनिहाय सामान्य ज्ञान स्पर्धेसाठी गट पाडण्यात आले. सूत्रसंचालक यांनी गटांना प्रश्न विचारले. झटपट फेरी घेण्यात आली. यात उत्तर देणाऱ्या संघाला या प्रसंगी गौरविण्यात आलं. या स्पर्धेचे सूत्रसंचालन रश्मी कन्नुरकर यांनी केलं. त्यानंतर परीक्षक म्हणून डॉ. गणेश मुडेगावकर, मल्लिनाथ साखरे यांनी निकाल घोषित केला.

निकाल याप्रमाणे प्रथम क्रमांक - चन्नाप्पा येडगे, राजश्री हिप्परकर, द्वितीय - सुचिता सरवदे ,स्वामिनी रुपनर, तृतीय - अर्चना जवळकोटे, युनूस बरुर , उत्तेजनार्थ - भगवान देशमुख,मानसी जोशी, आरती बुधारा,स्वाती धोत्रे (नेताजी जुनियर कॉलेज सोलापूर) याप्रसंगी प्रा. शिवशरण दुलंगे, साहेबण्णा निम्बर्गी, शिवराज पाटील, दत्तात्रय गुड्डेवाडी, डॉ. विठ्ठल अरबाळे, हर्षवर्धन पाटील, विश्वनाथ कक्कळमेली, रविन बिराजदार, रश्मी कानूरकर, कोमल कोंडा, शहाजी माने, शंकर कोमुलवार, प्रकाश कतनळी,संतोष पवार, डॉ. गणेश मुंडेगावकर, मंजुळा बीड, रंगसिद्ध पाटील, संगीता म्हमाणे आदी उपस्थित होते.



# विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळतो –कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस

## संगमेश्वर कॉलेजमध्ये दोन दिवसीय विज्ञान प्रकल्प प्रदर्शन





सोलापूर (दिनांक२०)
"शालेय आणि कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील वैविध्यपूर्ण विज्ञान प्रकल्पातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळतो. संशोधनाची दृष्टी मिळते, त्यातून विद्यार्थी आपापल्या विभागातील संशोधन निष्ठेने आणि आवडीने करतो. कठोर परिश्रम घेऊन शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन ग्रामीण विकासाचे अनेक मॉडेल शेतकऱ्यांची मुले करत आहेत. नक्कीच मुले याचा वापर आपल्या प्रत्यक्ष शेती उद्योगात करतील असा विश्वास वाटतो.'' असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉक्टर मृणालिनी फडणवीस यांनी केलं.ते संगमेश्वर कॉलेज च्या वतीने आयोजित केलेल्या दोन दिवसीय विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.



 

संगमेश्वर कॉलेज च्या आवारातील संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या इमारतीत हे दोन दिवसीय प्रदर्शन भरले आहे. यामध्ये विविध महाविद्यालयातील 145 प्रकल्पांचा समावेश आहे. याप्रसंगी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, सोलापूर विज्ञान केंद्राचे राहुल दास , उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षण निरीक्षक मिलिंद मोरे, श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक सिद्धाराम चाकोते, भूगर्भ तज्ञ डॉक्टर पी. टी. सावंत,कॉलेजच्या प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली आदी, पर्यवेक्षक प्रसाद कुंटेआदी मान्यवर उपस्थित होते.
कुलगुरू फडणवीस पुढे म्हणाले की,'' शालेय स्तरावर मूलभूत विज्ञानातून मुले घडतात मात्र कनिष्ठ महाविद्यालयीन विज्ञान शाखा, कला शाखा, वाणिज्य शाखेतील विद्यार्थी आपापल्या शाखेतून मिळालेल्या ज्ञानाचा शाखेतील वापर प्रत्यक्ष कृतीत करताना दिसत आहेत. त्याचे बोलके उदाहरण म्हणजे सेंद्रिय शेतीचे प्रयोग. अपार्टमेंट शेती. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांबरोबर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, कम्प्युटर सायन्स या क्षेत्रातील विद्यार्थी त्याच्या ज्ञानाचा वापर करून मानवी जीवन सुखकर करण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाचे व्यासपीठ गाजवत आहेत.या गटाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण प्रयोग विद्यार्थी देशासमोर आणत आहेत.''
उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षण निरीक्षक मिलिंद मोरे म्हणाले की , ''विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयातून समस्या सोडवण्यासाठी मूलभूत उपाय सुचवले आहेत नाविन्यपूर्ण प्रयोग अतिशय कष्टाने रेखीवपणे मांडले आहेत त्याचा नक्कीच फायदा त्यांच्या पुढील आयुष्यात होईल .संशोधन प्रकल्पातून असे शेतकरीसंशोधक तयार होतील.असा विश्वास वाटतो. महाविद्यालयीन स्तरावरील असे उपक्रम विद्यार्थ्यांना मार्गदर्शनीय ठरतात.'' असे सांगत आयोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रयोगाचे कौतुक करत शाबासकीची थाप दिली.सोलापूर सायन्स सेंटरचे राहुल दास यांनी प्रयोगाचे पाहणी करत विद्यार्थ्यांनी केलेल्या कष्टाचे आणि सादरीकरणाचे कौतुक केले.
विज्ञान हे विश्वकल्याणासाठी हे ब्रीद घेऊन कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रयोग, विज्ञानातील नवोपक्रम, पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांवर आधारित प्रकल्प , इलेक्ट्रोनिक अँड कम्युनिकेशन या विभागातील प्रकल्पांचा समावेश यामध्ये आहे .विज्ञान प्रकल्प यशस्वीतेसाठी विज्ञान विभागातील प्रमोद उडगीकर,समन्वयक एम. आर. वाली, आर. एफ. डोंगरे, सुभाष पाटील ,आर. एस. कट्टी ,बी. पी. रणे यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थी मंडळी परिश्रम घेतले.





संगमेश्वर कॉलेज च्या आवारातील संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या इमारतीत हे दोन दिवसीय प्रदर्शन भरले आहे. यामध्ये विविध महाविद्यालयातील 145 प्रकल्पांचा समावेश आहे. याप्रसंगी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, सोलापूर विज्ञान केंद्राचे राहुल दास , उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षण निरीक्षक मिलिंद मोरे, श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक सिद्धाराम चाकोते, भूगर्भ तज्ञ डॉक्टर पी. टी. सावंत,कॉलेजच्या प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली आदी, पर्यवेक्षक प्रसाद कुंटेआदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू फडणवीस पुढे म्हणाले की,'' शालेय स्तरावर मूलभूत विज्ञानातून मुले घडतात मात्र कनिष्ठ महाविद्यालयीन विज्ञान शाखा, कला शाखा, वाणिज्य शाखेतील विद्यार्थी आपापल्या शाखेतून मिळालेल्या ज्ञानाचा शाखेतील वापर प्रत्यक्ष कृतीत करताना दिसत आहेत. त्याचे बोलके उदाहरण म्हणजे सेंद्रिय शेतीचे प्रयोग. अपार्टमेंट शेती. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांबरोबर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, कम्प्युटर सायन्स या क्षेत्रातील विद्यार्थी त्याच्या ज्ञानाचा वापर करून मानवी जीवन सुखकर करण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाचे व्यासपीठ गाजवत आहेत.या गटाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण प्रयोग विद्यार्थी देशासमोर आणत आहेत.''

उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षण निरीक्षक मिलिंद मोरे म्हणाले की , ''विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयातून समस्या सोडवण्यासाठी मूलभूत उपाय सुचवले आहेत नाविन्यपूर्ण प्रयोग अतिशय कष्टाने रेखीवपणे मांडले आहेत त्याचा नक्कीच फायदा त्यांच्या पुढील आयुष्यात होईल .संशोधन प्रकल्पातून असे शेतकरीसंशोधक तयार होतील.असा विश्वास वाटतो. महाविद्यालयीन स्तरावरील असे उपक्रम विद्यार्थ्यांना मार्गदर्शनीय ठरतात.'' असे सांगत आयोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रयोगाचे कौतुक करत शाबासकीची थाप दिली.सोलापूर सायन्स सेंटरचे राहुल दास यांनी प्रयोगाचे पाहणी करत विद्यार्थ्यांनी केलेल्या कष्टाचे आणि सादरीकरणाचे कौतुक केले.

विज्ञान हे विश्वकल्याणासाठी हे ब्रीद घेऊन कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रयोग, विज्ञानातील नवोपक्रम, पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांवर आधारित प्रकल्प , इलेक्ट्रोनिक अँड कम्युनिकेशन या विभागातील प्रकल्पांचा समावेश यामध्ये आहे .विज्ञान प्रकल्प यशस्वीतेसाठी विज्ञान विभागातील प्रमोद उडगीकर,समन्वयक एम. आर. वाली, आर. एफ. डोंगरे, सुभाष पाटील ,आर. एस. कट्टी ,बी. पी. रणे यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थी मंडळी परिश्रम घेतले.

# Science Expo







# Science Expo 2019






















Science Expo 2019

